Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VII ISSUE- XI NOVEMBER 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# महिला सबलीकरण आणि उपाय योजना

संशोधक
**श्री. चंद्रशेखर उत्तमराव शिंदे**
मार्गदर्शक
**डॉ. मधुकर अंबाजी पुंडगे**
एम.ए. एम. एड. पी. एच.डी.(Edu)

सबलीकरण हा शब्द वंचित गटात काम करणारे कार्यकर्ते नेहमी वापरतात. महिलांचे सबलीकरण, दलितांचे सबलीकरण, आदिवासींचे सबलीकरण, कामगारांचे, शेतमजुरांचे आणि गरिबांचे सबलीकरण हे शब्द सर्वास कानावर पडतात. पण या संकल्पनेची स्पष्ट चर्चा होत नाही. सबलीकरण म्हणजे काय याची कार्यकर्त्यांना स्पष्ट कल्पना नाही. ही संकल्पना स्पष्ट झाली तर त्यांना त्यांचे कार्य प्रभावीपणे करता येईल. यादृष्टीने या संकल्पनेचे स्पष्टीकरण करणे हा या ग्रंथाचा मुख्य हेतू आहे. विविध प्रकारचे सामाजिक, आर्थिक व राजकीय कार्य करणाऱ्यांना व अशा कार्यात रस असणाऱ्यांना याचा उपयोग व्हावा अशी अपेक्षा आहे.

सबलीकरण म्हणजे बल वाढवणे. बल किंवा बळ हा शब्द इंग्रजीतील पॉवर' शब्दाप्रमाणेच अनेक अर्थांनी वापरला जातो. बल हा शब्द शक्ती या अर्थानेही वापरला जातो. त्यामुळे काहीजण सबलीकरणाला सशक्तीकरण असा प्रतिशब्द वापरतात. कित्येकदा बल शब्द सत्ता या अर्थाने वापरला जातो. उदा. आर्थिक बळ.

सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ मॅक्स वेबर यांनी बळ याची व्याख्या सामाजिक संबंधात व्यक्तीची इतरांचा विरोध असताना आपली इच्छा पुरी करण्याची संभनीयता अशी केली आहे. या व्याख्येत काही गोष्टी अनुस्यूत आहेत. एकतर ही इच्छा सामाजिक संबंधात असली पाहिजे. सूर्योदय किंवा ग्रहण पाहण्याची इच्छा सामाजिक संबंधात नाही म्हणून या इच्छेच्या व्याख्येत तिचा समावेश होणार नाही. आमदार होण्याची इच्छा सामाजिक संदर्भात आहे. दुसरे म्हणजे व्यक्तीला अशी इच्छा झाली पाहिजे. इच्छाच नसेल तर बळाचा प्रश्नच येत नाही. तिसरे म्हणजे ही इच्छा इतरांचा विरोध असला तरी पुरी होण्याची संभवनीयता असली पाहिजे. संभवनीयता म्हणजे खात्री नव्हे. संभवनीयता म्हणजे व्यक्तीची किंवा गटाची आपल्या विशिष्ट गरजा पूर्ण करण्याची संभवनीयता. त्यात दोन गोष्टींचा समावेश आहे, एक तर इच्छा पुरी करण्यासाठी व्यक्तीकडे क्षमता असली पाहिजे आणि दुसरे म्हणजे अशी क्षमता वापरण्याची संधी असली पाहिजे. सबलीकरणाच्या इतरही व्याख्या आहेत. सबलीकरण. म्हणजे एखाद्या गटाची आपल्या प्रगतीची व परिस्थितीच्या बदलाची रूपरेषा आखून त्यासाठी कृती करणे. ही व्यक्तिगत आणि सामूहिक अशी दुहेरी प्रक्रिया आहे. सबलीकरण म्हणजे निर्णयप्रक्रियेबाहेरच्या लोकांना त्या प्रक्रियेत आणणे. एखाद्या गटाचे उदा. महिलांचे सबलीकरण म्हणजे त्या गटाने संघटित होऊन स्वत:च्या बळावर आपल्या प्रगतीची दिशा ठरविणे व ज्यामुळे त्यांना दुय्यम

स्थान मिळाले आहे अशा साधनसंपत्तीवर ताबा मिळवून प्रगती करणे.

बळाची दुसरी व्याख्या आहे ती म्हणजे दुसऱ्यांकडून आपले काम करवून घेण्याची शक्ती. वेबर यांनी एखाद्या गटाचे बळ म्हणजे दुसऱ्या गटाला वा गटांना त्यांच्या इच्छेविरुद्ध एखादे काम करावयास लावणे अशी व्याख्या केली आहे. दुसऱ्यांकडून आपले काम करवून घेणे म्हणजे बळ. हे अनेक प्रकारे करता येते. समाजात आपण आपले काम करत असतो. लहान मुले सुद्धा रडून इतरांना त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यास आणि अनेकदा त्याप्रमाणे वागण्यास भाग पाडतात. प्रत्येकवेळी दुसर्याकडून काम करवून घेताना सक्ती करावी लागते असे नाही. प्रत्येक व्यक्ती आपण आपल्यासाठीच काम करू असे वागली तर समाज चालणार नाही. कुटुंबात सर्वजण एकमेकांची कामे करतात. त्यात सक्ती नसते. ज्यावेळी दुसऱ्याचा फायदा नसणारे काम आपण त्याच्याकडून करून घेतो तेव्हा सक्तीचा म्हणजे बळाचा प्रश्न येतो. उदा. पूर्वी मालक गुलामांना मारून आपले काम करून घेत असे.

आपल्याला पाहिजे ते करण्याची शक्ती आणि दुसर्याकडून काम करून घेण्याची शक्ती या बळाच्या व्याख्या वेगवेगळ्या असल्या तरी त्या परस्परपूरक आहेत. आपल्याला पाहिजे ते करणे शक्य झाल्यास इतरांची आपल्याकडून काम करून घेण्याची शक्ती कमी होईल. इतरांची आपल्याकडून त्यांना पाहिजे ते काम करून घेण्याची शक्ती कमी झाल्यास आपल्याला आपले काम करणे सोपे जाईल.

सबलीकरण म्हणजे दुर्बल घटकांच्या निवड, प्रभाव आणि कृती होय.

शालेय स्तरावर विद्यार्थीनी करीता काही योजना ज्या द्वारे होणारी आर्थिक मदत

1.सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना.

योजनेचा उद्देश:-

शासन निर्णय दिनांक 12 जानेवारी, 1996 अन्वये विजाभज विद्यार्थीनीं करिता व शासन निर्णय दिनांक 29 ऑक्टोबर, 1996 पासून विमाप्र प्रवर्गाच्या विद्यार्थीनींना सुध्दा लागू करण्यांत आली आहे. सदरहू प्रवर्गाच्या विद्यार्थीनींचे गळतीचे प्रमाण कमी करण्यांसाठी प्रोत्साहनपर अनुदान म्हणून ही शिष्यवृत्ती दिली जाते.

योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव

विमुक्त जाती व भटक्या जमाती/ विशेष मागास प्रवर्ग.

योजनेच्या प्रमुख अटी:-

- विद्यार्थीनी विजाभज / विमाप्र या प्रवर्गातील असावी.
- विद्यार्थीनी इ. 5 वी ते 7 वी मध्ये शिकणारी असावी.
- विद्यार्थीनी ही शासन मान्य शाळेत नियमित शिकणारी असावी.

दिल्या जाणा-या लाभाचे स्वरुप

प्रति विद्यार्थीनीस दरमाह रुपये 60/- याप्रमाणे 10 महिन्या करीता रु.600/- शिष्यवृत्तीची रक्कम संबंधीत लाभार्थ्यांस अदा केली जाते.

अर्ज करण्याची पध्दत:-

सदर योजनेचे संगणकीकरण झालेले असून ऑनलाईन फॉर्म भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी https://mahaeschol.maharashtra.gov.in या वेबसाईटवर या योजनेंतर्गत पात्र विद्यार्थिनींचे अर्ज / माहिती भरुन संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे सादर करावी.

संपर्क कार्यालयाचे नांव:- संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद.

सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई शहर/ उपनगर.
संबंधित शाळांचे मुख्याध्यापक.

2. शैक्षणिक कर्ज योजना:-

योजनेचा उद्देश:-

अनूसुचित जातीतील चर्मकार समाजातील (चर्मकार, ढोर, होलार, मोची इत्यादी) व्यक्तींना त्यांचे जीवनमान उंचविणे, समाजप्रवाहात त्यांना मानाचे स्थान मिळण्याच्या उद्देशाने त्यांचा शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक विकास होण्यासाठी महामंडळामार्फत योजना राबविण्यात येतात.

योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नांव अनुसूचित जातीतील चर्मकार समाज.

योजनेच्या प्रमुख अटी:-

अर्जदार हा अनुसूचित जातीतील चर्मकार समाजाचा असावा.

अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा. अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्षांपर्यंत असावे.अर्जदाराने जो व्यवसाय निवडला असेल त्या व्यवसायाचे ज्ञान व अनुभव त्याला असावा. ( अ) अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ग्रामीण भागासाठी रु.९८०००/ व शहरी भागासाठी रु.१२००००/ पर्यंत असावे. (ब) राज्य शासन पुरस्कृत योजनांसाठी शहरी व ग्रामीण भागातील उत्पन्न मर्यादा रु.१०००००/ पर्यंत असावे.

जातीचा व उत्पन्नाचा दाखला तहसिलदार किंवा तत्सम सक्षम प्राधिकायाने दिलेला असावा.

अर्जदाराने या महामंडळाकडून अथवा इतर कोणत्याही शासकीय उपक्रमाकडून आर्थिक लाभ घेतलेला नसावा.

महामंडळाने वेळोवेळी घालून दिलेल्या अटी व शर्ती अर्जदारावर बंधनकारक राहतील.

दिल्या जाणाया लाभाचे स्वरुप:-

एनएसएफडीसी नवी दिल्ली यांच्या कर्ज योजने अंतर्गत सन २००९ या वर्षापासून शैक्षणिक कर्ज योजना राबविण्यात येत आहे. सदर योजने अंतर्गत शैक्षणिक कर्ज योजना राबविण्यात येत आहे. सदर योजने अंतर्गत शैक्षणिक कर्ज मर्यादर देशात शिक्षणसाठी रु.१० लाख व परदेशासाठी रु.२० लाख इतकी आहे. या कर्जावर ४ टक्के व्याजदर आकारण्यात येतो.

अर्ज करण्याची पध्दत:-

अर्जाचा नमुना महामंडळाच्या जिल्हा कार्यालयात विनाशुल्क स्वरुपात उपलब्ध असेल.

अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज भरुन संपूर्ण कागदपत्रांसह जिल्हा कार्यालयात अर्ज सादर करावयाचा आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, महाराष्ट्र सरकार

**संदर्भ ग्रंथ**

१. बापट भा. गो. (१९८९), "शैक्षणिक संशोधन", प्रकाशन गो. के. जोगलेकर, नुतन प्रकाशन, नारायण सदन, सदाशिव पेठ,टिळकपथ, पुणे ४११ ०३०.
२. जोशी अनेत, कुशारे अरूणा (१९९९), "संशोधन प्रश्नावलीचे उपयोजन", पुष्प सातवे, संशोधन मार्गदर्शक मालिका, प्रकाशक डॉ. वडनेरे राजेद, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
३. देशपांडे लिना (१९९९), "सर्वेक्षण एक संशोधन पध्दती", पुष्प चवथे, संशोधन मार्गदर्शक मालिका, प्रकाशन डॉ. वडनेरे राजेद, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
४. पोखरापूरकर राजा (१९९९), "संशोधनासाठी नमूना निवड", पुष्प अकरावे, संशोधन मार्गदर्शक मालिका, प्रकाशन डॉ.वडनेरे राजेंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
५. जोशी अनंत, महाले संजीवनी (१९९९), "संशोधन अहवालाची लेखन पध्दती", पुष्प चवदावे, संशोधन मार्गदर्शक मालिका,प्रकाशन डॉ. वडनेरे राजेंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
६. प्र. देशपांडे (१९९४), "संशोधन पध्दती", यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

७. भिंताडे वि. रा. (१९८९), "शैक्षणिक संशोधन पध्दती", प्रकाशक गो. के. जोगलेकर, नुतन प्रकाशन, २१८१, सदाशिव पेठ,पुणे ४११ ०३०.

८. मुळे श. शं., उमाठे वि. तु. (१९८७), "शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे", संचालक सचिव, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, लॉ कॉलेज परिसर, महात्मा गांधी मार्ग, नागपूर ४४० ००१. ९. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक (१९९९), संशोधन मार्गदर्शन मालिका, पुष्प आठवे, संशोधन मुलाखतीचे उपयोजन.